# History Research Journal

***..आणि समर्पणाच्या भावनेतून मी शिक्षकाचे काम स्वीकारले.***

“धर्म ऱ्हदयाकडून ऱ्हदयाकडे जातो अशी एक महत्वपूर्ण म्हण आहे. शिक्षणाच्या बाबतीत तर ही म्हण अधिक यथार्थ आहे. अंत:करणातून खरे शिक्षण बाहेर पडू शकेल. मानवी अंत:करणाच्या अंतरंगातील तारा छेडल्या गेल्याशिवाय विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व विकसित होणे शक्य नाही. यासाठी पुन्हा विकसित अंत:करणाची आवश्यकता आहे. विद्यार्थी जीवनाच्या सर्व स्पंदनाची नोंद घेणारे शुद्ध अंत:करण हवे आहे. आपण विद्यार्थ्यांहून श्रेष्ठ व निराळे आहोत. किंवा आपले स्थान वरचे आहे ही जाणीव न ठेवता आपण त्यांचे एक स्नेही व सहकारी आहोत असे समजून एकरूप होण्याची, त्यांच्या जीवनाचे अविभाज्य अंग बनण्याची आवश्यकता आहे. अशा प्रकारचा शिक्षकच मुलांना चांगले शिक्षण देऊ शकेल, मी स्वत:ला पुढीलप्रमाणे प्रश्न विचारायला प्रारंभ केला. मी स्वत:वर जितके प्रेम करतो तितकेच विद्यार्थ्यांवर करू शकेन काय? मी स्वत:ला जशी क्षमा करतो, तशी विद्यार्थ्यांना त्यांच्या चुकीबद्दल क्षमा करू शकेन काय? त्यांच्या सुख दु:खात मी सहभागी होऊ शकेन काय? मुलांच्या जीवनातील सर्व अवस्थांत मी त्यांच्याशी पूर्णपणे एकरूप होऊ शकेन काय? मी हे करू शकेन असे मला वाटले आणि समर्पणाच्या भावनेतून मी शिक्षकाचे काम स्वीकारले.”

**–पू. स्वामी रामानंद तीर्थ**

इतिहास संशोधन पत्रिका

अंक तीस

UGC Care Listed Journal

ISSN-0976-5425

## मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद
### (छत्रपती संभाजीनगर)

# History Research Journal

## Issue - XXX

# इतिहास संशोधन पत्रिका

## अंक तीस




Scanned with AnyScanner

# भारत इतिहास संशोधक मंडळ

१३२१, सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०

दूरध्वनी : ०२०-२४४७२५८१ Email : bismpune@gmail.com

जावक क्र. - २३/२०६ दि. १०/०२/२०२३

प्रती,

श्री. डॉ. सोमनाथ रोडे

४, शारदानगर अंबाजोगाई रोड ,

लातूर - ४१३५३१.

## आभारपत्र

विषय- ग्रंथ भेट दिल्याबद्दल आभारपत्र.

महोदय,

स.न.वि.वि,

आपण भारत इतिहास संशोधक मंडळास इतिहास संशोधन पत्रिका अंक २८ आणि २९ हा ग्रंथ भेट दिल्याबद्दल मंडळ आपले ऋणी आहे. सदरील ग्रंथ मंडळाच्या ग्रंथालयात वाचकांसाठी उपलब्ध करून दिलेला आहे. त्यामुळे वाचकांपर्यत ते निश्चित पोहोचेल. मंडळाविषयी असलेले ऋणानुबंध असेच कायम ठेवावे ही विनंती.

आपला

श्री. पांडुरंग बलकवडे

सचिव भारत इतिहास संशोधक मंडळ



UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखक | पृष्ठांक | शिर्षक |
|---|---|---|---|
| | **प्राचीन विभाग** | | |
| १. | Shri. Mayuresh Khadke | १७ | Antiquarian Remains found at Sakaleshwar Temple, Ambejogai |
| २. | डॉ. अरविंद सोनटक्के | २७ | प्राचीन भारतीय साहित्यांतील मुक्त लैंगिक संवाद आणि आधुनिक श्लील - अश्लीलता |
| ३. | डॉ. गोपालसिंह बच्छिरे | ३६ | चवर वंश और चमार जाति : एक ऐतिहासिक अध्ययन |
| | **मध्ययुगीन विभाग** | | |
| १. | Dr. Babruwan More | ४७ | Father of Indian Navy - Chhatrapati Shivaji Maharaj |
| २. | डॉ. नारायण सुर्यवंशी | ५५ | गढीवाड्यांच्या प्रभावाखालील समाजजीवन : एक शोध |
| ३. | डॉ. संजय पाईकराव | ६२ | लीळा चरित्रातील वेरुळचे संदर्भ : सांस्कृतिक दृष्टिक्षेप |
| ४. | श्रीमती स्वाती आदिनाथ बांगर | ६७ | पितृसत्ताक मूल्ये आणि संत बहेणाबाईची स्त्रीभक्ती वाणी |
| ५. | श्रीमती दीपिका हिम्मत पवार | ७३ | मराठवाड्यातील महानुभव पंथातील स्त्री संताचे समाजजीवन आणि कार्य |
| ६. | श्री. लक्ष्मण गजानन गणगे | ८० | संत तुकारामांच्या अभंगातून प्रतीत होणाऱ्या शेतीविषयक विचारांची प्रासंगिकता |
| ७. | श्री. सचिन गोवर्धन कांबळे | ८८ | मराठेकालीन सांस्कृतिक जीवन व लोककलेतील घटकांचा अभ्यास |




UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425

Scanned with AnyScanner

(२)

# गढी-वाड्यांच्या प्रभावाखालील समाजजीवन : एक शोध

डॉ. नारायण सूर्यवंशी
शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ, लातूर

मध्ययुगाच्या सुरुवातीला प्राचीन मध्यवर्ती सत्तांचा ऱ्हास होऊन ठिकठिकाणी प्रादेशिक राजसत्ता उदयास येऊ लागल्या, त्यांना लष्करी व अन्य सेवा पुरविण्याचे महत्त्वाचे काम सामंतांनी केले. या सेवेबद्दल राजांनी त्यांना इनाम जमिनी दिल्या. राजाचे नाममात्र सार्वभौमत्व मान्य करुन हे सामंत आपापल्या प्रदेशात स्वतंत्रपणे राहू लागले. यातून एक नवी व्यवस्था अस्तित्वात आली, तिला 'सामंतशाही' असे नाव दिले गेले. सामंतशाहीचा विकास हे मध्ययुगाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. यूरोपातील सामंत आपापल्या भूप्रदेशात तटबंदी असलेले वाडे बांधून राहू लागले, त्या वाड्याला 'गढी' असे म्हणत. गढी या शब्दाचा अर्थ 'लहान किल्ला' किंवा 'बुरूज' असलेला पण खंदक नसलेला 'भुईकोट वाडा' यालाच 'गढी' असे म्हणतात.[1] साधारणपणे इ. सनाच्या १० व्या शतकापासून ते २० व्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत या गढी-वाड्यांतूनच ग्राम प्रशासन, नगरनियोजन केले गेल्याचे इतिहास सांगतो. फ्रान्समध्ये सरंजामदार भव्यदिव्य अशा प्रकारच्या गढ्या उभारीत होते तसेच महाराष्ट्रातही मध्ययुगीन कालखंडात स्थानिक अधिकाऱ्यांनी अथवा वतनदारांनी आपापल्या ऐपतीनुसार गढी-वाडे उभारले. शनिवारवाडा ही गढी-वाड्याचीच प्रतिकृती आहे. किंबहुना भुईकोट किल्लेवजा असूनही त्याला 'वाडा' असे नामाभिधान दिले आहे.[2]

किल्ल्यात राजा अथवा सरदार किंवा किल्लेदार राहात असे. तो त्या प्रदेशाचा स्वामी असे परंतु गढीतील अधिकारी स्थानिक अधिकारी अथवा पाच-दहा गावांचा वतनदार किंवा राजाचा प्रतिनिधी दिसतो. सरदार, जहागीरदार, देशमुख, देशपांडे, पाटील, पटवारी अथवा कुलकर्णी हे अधिकारी किंवा राजाचे प्रतिनिधी स्वत:साठी अशा गढ्या उभारीत असत.[3] प्रत्येक अधिकारी किंवा वतनदार आपल्या राजाचे अनुकरण


UGC Care Listed Journal : ISSN : 0976 - 5425

करून आपापल्या ऐपतीनुसार, उत्पन्नानुसार आपल्या प्रदेशात गढी-वाडे उभारल्याचे दिसते. श्रीमंत शेतकरी, व्यापारी, सावकार इत्यादी लोकांनीही गावामधून मोठमोठे चिरेबंदी वाडे उभारलेले दिसतात.

गावाकरिता किंवा देशाकरिता करीत असलेल्या कर्तव्याबद्दल एखाद्या व्यक्तीला त्याच्या उपजीविकेकरिता, मानमरातब राखण्यासाठी जनतेने दिलेले व परंपरेने चालणारे उत्पन्न म्हणजे 'वतन' व त्या वतनाचा मालक म्हणजे 'वतनदार' होय.[४] ग्रामाचा कारभार नीटपणे चालावा म्हणून मध्ययुगात राज्यकर्त्यांनी या वतन संस्थेस मान्यता दिली. राजे आपल्या मर्जीतील व्यक्तींना वतने देऊलागले. यादव काळापूर्वी ही संस्था व्यवस्थित कार्यरत असल्याचे दाखले अनेक ऐतिहासिक साधनांमधून मिळतात. यादव काळात वतनदारी पद्धती पूर्णतः प्रस्थापित झालेली दिसते. गाव वसविणारा पुढारी गावाचा 'पाटील' झाला म्हणून गावात पाटलाचे घराणे प्रमुख असून गावात मानाने सर्वांत वडील असावयाचे. जो गावाची बाजू सावरून उचलून धरणारा व गावाला घेऊन चालणारा म्हणून रयतेला पटला आणि महसूल वसूल, बंदोबस्त हे सरकारी काम बिनबोभाट करणारा म्हणून सरकारला पटला तो गावाचा 'पाटील' केला.[५] त्याने पुढे आपल्या उत्पन्नाच्या ऐपतीनुसार व प्रतिष्ठेनुसार गढी-वाडा बांधला.

**गढी-वाड्यांच्या प्रभावाखाली समाजजीवन :**

गढी-वाड्यांचा सामाजिक जीवनावर प्रभाव पडलेला दिसतो. राज्यकर्त्यांनी, सरदारांनी अथवा वतनदारांना गावे व जमिनी जहागीर व इनाम म्हणून देण्यास सुरुवात केली तेव्हापासून समाजव्यवस्थेत बदल होत गेले. कल्याणीच्या चालुक्य काळात अनेक मंत्र्यांना, अधिकाऱ्यांना जमिनी, गावे इनाम व दान दिल्याचे उल्लेख मिळतात. मध्ययुगीन कालखंडात राजा, वतनदार, वतनदाराचे नाते संबंधी, शेतकरी, बलुतेदार, अलुतेदार व कामगार या पद्धतीची समाजरचना तयार झाली. यादव, बहामनी, निजामशाही, आदिलशाही, बरीदशाही, मोगल व हैद्राबादची निजामशाही यांच्या काळात हीच समाजव्यवस्था अस्तित्वात राहिली. राजे बदलले तरी या व्यवस्थेत फार मोठे परिवर्तन झालेले दिसत नाही. म्हणजेच गढी-वाड्याच्या प्रभावाखाली एक वेगळी समाजरचना निर्माण झाली. गावच्या वतनदारांना गावात राजासारखा मान होता, गावात देशमुख,



देशपांडे, पाटील, पटवारी यांना अवास्तव महत्त्व आले होते. त्यानंतर शेतकरी, गाव, नोकर, कोतवाल, जागल्या, यसकर आणि बारा बलुतेदार, अठरा आलुतेदार यांनाही समाजात त्यांच्या कामावर आधारित महत्त्व होते. या काळात स्त्रियांची स्थिती दयनीय होती. त्याखालोखाल गावकुसाबाहेर राहणाऱ्या जमातीवरील वर्गाची सेवा करून निकृष्ट प्रकारचे जीवन जगत असलेल्या दिसतात.

**वतनदार :**

महाराष्ट्रात ग्रामसंस्थेत वतनदार, मिरासदार व उपरी या तीन वर्गाचा समावेश होतो. वतन म्हणजे गावाकरिता किंवा देशासाठी करीत असलेल्या कर्तव्याबद्दल त्या व्यक्तीच्या उपजीविकेसाठी मानमरातब राखण्यासाठी व जनतेने दिलेले, वंशपरंपरेने चालणारे उत्पन्न होय.[६] महाराष्ट्रात वतन या शब्दाचा अर्थ समाजाला रुजू केलेल्या सेवेबद्दल एखाद्यास करमाफ किंवा नाममात्र कर देणारी जमीन आणि काही हक्क व अवांतर प्राप्ती असा होतो. वतनाचा दुसरा अर्थ वंशपरंपरेची चाकरी, धंदा, अधिकार, हक्क, इनाम व बक्षीसही होतो.[७] मध्ययुगीन कालखंडात महाराष्ट्रात ग्रामसंस्था चालविण्यासाठी वतन पद्धतीचा अवलंब केलेला दिसतो. एखाद्या खेड्यात अथवा नगरात सर्वप्रथमपासून वास्तव्य करणाऱ्यांनाही 'वतनदार' हा शब्द वापरला जातो. येथे मात्र गावकर्त्याला वतनदार असे म्हणतात. वतनाचा उपभोग घेणाऱ्या अधिकाऱ्याला वतनदार असे म्हटले जाई, वतनदारांचे दोन प्रकार आहेत. राजकीय वतनदार व सामाजिक वतनदार. वतनदारांची विभागणी त्याच्या अधिकाराखाली असलेल्या क्षेत्रावरून केली आहे. त्यात परगणे वतनदार, गाव वतनदार, पेठेचे वतनदार हे वतनदार दैनंदिन जीवनामध्ये शासनाच्या नियमांप्रमाणे आपापली वतनी कामे करून अधिकार व मानपान उपभोगत असत.[८] या वतनदारांचा समाजात वरचा वर्ग होता. वतनदारांना समाजात मानाचे स्थान होते. हे वतनदार जमीनदारही होते. वतन हे अधिकाऱ्यांच्या हुद्यासाठी असून मिराशी व उपरी जमिनीच्या उपभोगाशी संबंधित होते. देशमुख, देशपांडे, पाटील, पटवारी इत्यादी वतनदार हे राजकीय वतनदार होते. या राजकीय वतनदारांना लोकांकडून वेगवेगळ्या मोफत सेवा मिळत होत्या तसेच या वतनदारांना समाजाकडून मानपानही प्राप्त झाला होता. या राजकीय वतनदारांनी आपल्या वर्चस्वाखाली गावामधून अथवा परिसरातून महसूल गोळा करून त्यांचा काही हिस्सा स्वतःसाठी ठेवला व ज्याच्या त्याच्या ऐपतीनुसार व उत्पन्नानुसार त्यांनी आपापल्या वतनाच्या गावी गढी-वाडे उभारले.



Scanned with AnyScanner

देशपांडे, पाटील, पटवारी यांना अवास्तव महत्त्व आले होते. त्यानंतर शेतकरी, गाव, नोकर, कोतवाल, जागल्या, यसकर आणि बारा बलुतेदार, अठरा आलुतेदार यांनाही समाजात त्यांच्या कामावर आधारित महत्त्व होते. या काळात स्त्रियांची स्थिती दयनीय होती. त्याखालोखाल गावकुसाबाहेर राहणाऱ्या जमातीवरील वर्गाची सेवा करुन निकृष्ट प्रकारचे जीवन जगत असलेल्या दिसतात.

**वतनदार :**

महाराष्ट्रात ग्रामसंस्थेत वतनदार, मिरासदार व उपरी या तीन वर्गांचा समावेश होतो. वतन म्हणजे गावाकरिता किंवा देशासाठी करीत असलेल्या कर्तव्याबद्दल त्या व्यक्तीच्या उपजीविकेसाठी मानमरातब राखण्यासाठी व जनतेने दिलेले, वंशपरंपरेने चालणारे उत्पन्न होय.[६] महाराष्ट्रात वतन या शब्दाचा अर्थ समाजाला रुजू केलेल्या सेवेबद्दल एखाद्यास करमाफ किंवा नाममात्र कर देणारी जमीन आणि काही हक्क व अवांतर प्राप्ती असा होतो. वतनाचा दुसरा अर्थ वंशपरंपरेची चाकरी, धंदा, अधिकार, हक्क, इनाम व बक्षीसही होतो.[७] मध्ययुगीन कालखंडात महाराष्ट्रात ग्रामसंस्था चालविण्यासाठी वतन पद्धतीचा अवलंब केलेला दिसतो. एखाद्या खेड्यात अथवा नगरात सर्वप्रथमपासून वास्तव्य करणाऱ्यांनाही 'वतनदार' हा शब्द वापरला जातो. येथे मात्र गावकर्त्याला वतनदार असे म्हणतात. वतनाचा उपभोग घेणाऱ्या अधिकाऱ्याला वतनदार असे म्हटले जाई, वतनदारांचे दोन प्रकार आहेत. राजकीय वतनदार व सामाजिक वतनदार. वतनदारांची विभागणी त्याच्या अधिकाराखाली असलेल्या क्षेत्रावरुन केली आहे. त्यात परगणे वतनदार, गाव वतनदार, पेठेचे वतनदार हे वतनदार दैनंदिन जीवनामध्ये शासनाच्या नियमांप्रमाणे आपापली वतनी कामे करुन अधिकार व मानपान उपभोगत असत.[८] या वतनदारांचा समाजात वरचा वर्ग होता. वतनदारांना समाजात मानाचे स्थान होते. हे वतनदार जमीनदारही होते. वतन हे अधिकाऱ्यांच्या हुद्यासाठी असून मिराशी व उपरी जमिनीच्या उपभोगाशी संबंधित होते. देशमुख, देशपांडे, पाटील, पटवारी इत्यादी वतनदार हे राजकीय वतनदार होते. या राजकीय वतनदारांना लोकांकडून वेगवेगळ्या मोफत सेवा मिळत होत्या तसेच या वतनदारांना समाजाकडून मानपानही प्राप्त झाला होता. या राजकीय वतनदारांनी आपल्या वर्चस्वाखाली गावामधून अथवा परिसरातून महसूल गोळा करुन त्यांचा काही हिस्सा स्वत:साठी ठेवला व ज्याच्या त्याच्या ऐपतीनुसार व उत्पन्नानुसार त्यांनी आपापल्या वतनाच्या गावी गढी-वाडेउभारले.



या वतनदारांना समाजात मानाचे स्थान होते. त्यांच्या पदाप्रमाणे त्यांच्या राहावयाच्या वास्तूही तशाच भव्यदिव्य व मजबूत होत्या. चोर-दरोडेखोरापासून व परकीय शत्रूपासून कुटुंबाचे व स्वत:चे रक्षण व्हावे तसेच गावात दरारा वाढावा, पत व प्रतिष्ठा वाढावी यासाठी असे मोठ-मोठ्या आकारांचे गढी-वाडे उभारलेले दिसतात. याच गढी-वाड्यांतून समाजव्यवस्था चालविली गेली. ग्रामीण भागात राजाच्या खालोखाल समाजात या वतनदाराचा दबदबा होता. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांना हे वतन व वतनदार नष्ट करता आले नाहीत. प्रामुख्याने राजकीय वतनदारांत देशमुख व पाटील वतनदार बहुसंख्येने मराठा जातीतील असल्याचे आढळून येतात तर देशपांडे, कुलकर्णी हे वतनदार बहुसंख्येने ब्राह्मण जातीचेच असल्याचे आढळून आले. मराठवाड्यात मुस्लिमधर्मीय देशमुख व पाटील वतनदार आढळून येतात.

या वतनदारांना नेमून दिलेली कामे पार पाडावी लागत होती. अनेक गावांचा समुदाय म्हणजे परगणा होत असे. या परगण्याचा प्रमुख देशमुख असून त्याला देशपांडे हा अधिकारी जोडून दिलेला होता. अधिकारी परगण्याचे प्रमुख होते. या अधिकाऱ्यांना किंवा वतनदारांना वेगवेगळ्या सेवा मोफत मिळत.[९] देशमुख, देशपांडे, पाटील, पटवारी किंवा कुलकर्णी यांनी केलेल्या कामाबद्दल किंवा सेवेबद्दल समाजाने या वतनदारांना पोळ्याचा मान, दसऱ्याला सीमोल्लंघनाचा मान, शिमग्याची होळी पेटविण्याचा मान, गौराई बसविण्याचा मान, लग्नात वतनदाराला त्याच्या घरुन वाजवीत नेणे व टॉवेल टोपी करण्याचा मान, मांगाने तोरण व महाराने गेरु पाटलाच्या घरी द्यावे, गावच्या माळ्याने फुले देणे, कोणत्याही कार्यक्रमात टिळा व विड्याचा पहिला मान, गुरवाने वावरी देणे, दीपावलीला वाजंत्र्यांनी पाटलाच्या घरी वाजवावे इत्यादी मान-सन्मान दिले.[१०] त्याबद्दल वतनदार मंडळी रयतेची पुत्रवत काळजी घेत.

या राजकीय वतनदारांव्यतिरिक्त गाव वतनदार किंवा गाव नोकरही होते. मध्ययुगीन कालखंडात सरकारी वतनदारांना त्याच्या कामात मदत करण्यासाठी कोतवाल, जागल्या, येसकर इत्यादी गावनोकर नियुक्त केलेले होते. त्यांना गावकरी किंवा रयत बलुते देत असत. बलुतेदार व अलुतेदार (सामाजिक वतनदार) मध्ययुगीन काळातील समाजव्यवस्थेत महंत्त्वाचा तिसरा घटक म्हणजे बलुतेदार व आलुतेदार हे



Scanned with AnyScanner

चालली किंवा टिकवली गेली. इ. स. १९४८ ला हैद्राबादच्या निजामशाहीच्या ऱ्हासाबरोबर या समाजरचनेच्या ऱ्हासाला सुरुवात झाली. पाटीलक्या किंवा वतनदाऱ्या गेल्या, जमिनी कमी झाल्या, कारखाने निघाले. यामुळे बलुतेदार - अलुतेदारांनी कारखान्यात पगारी नोकर म्हणून काम करणे पसंत केले. परिणामी ही समाजव्यवस्था स्वतंत्र भारतात मोडकळीस आली.

गढी-वाड्यांच्या प्रभावाखालील सामाजिक जीवनाचा शोध घेतला असता खालील निष्कर्ष समोर येतात--

(१) राज्यकर्ते किल्ल्यात राहात होते, त्यांचे अनुकरण देशमुख, देशपांडे, पाटील, पटवारी, जहागीरदार, सरदार इत्यादींनी करून किल्लेवजा गढी-वाडे गावोगावी उभारल्याचे दिसते. याच गढी-वाड्यांतील वतनदारांचे अनुकरण श्रीमंत शेतकरी व सावकारांनी करून गावात मोठमोठे चिरेबंदी वाडे उभारलेले आहेत.

(२) गढी-वाड्यांच्या प्रभावाखालील समाजात जातिव्यवस्था अस्तित्वात होती.

(३) प्रत्येक जातीचा एकच व्यवसाय होता, तो समाजाने ठरवून दिलेला होता. तोच व्यवसाय ती जात पिढ्यानु-पिढ्या करीत होती.

(४) पाटील, पटवारी, देशमुख, देशपांडे हा वतनदार वर्ग समाजातील वरचा अथवा उच्च वर्ग होता. शेतकरी व व्यापारी हा दुसरा वर्ग. यांनाही समाजात वतनदारांच्या खालोखाल मान होता. त्यानंतर गावनोकर. त्यात कोतवाल, जागल्या, येसकर यांनाही लोक मान देत होते. त्यानंतर बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार आणि त्यानंतर अस्पृश्य समाज अशी समाजाची रचना होती.

(५) राजकीय वतनदार हे गावकर्ते असून गावच्या भल्या-बुऱ्याची जबाबदारी या वतनदारांचीच होती.

(६) वतनदार, न्यायाधीश, पंच, पोलिस इत्यादी भूमिका वटवीत होते.

(७) या व्यवस्थेत शेतकरी सर्वांचा पोशिंदा होता.

(८) वतनदार व अलुतेदार यांना त्यांच्या कामाच्या मोबदल्यात त्यांना धान्य पुरविणारा हा शेतकरी होता.

(९) खेडी स्वयंपूर्ण होती.

(१०) बलुतेदार व अलुतेदार शेतकऱ्यांकडून बलुते अथवा मोबदला घेऊन त्यांना वेगवेगळ्या सेवा पुरवीत होते.

(११) बारा बलुतेदार व अठरा अलुतेदार हे वंशपरंपरागत होते. त्या जातीतील बलुतेदाराने तोच व्यवसाय पिढ्यानु-पिढ्या करावा हे बंधन होते.

(१२) अस्पृश्य समाज गावकुसाबाहेर राहात होता. त्यात प्रामुख्याने महार, मांग, चांभार, ढोर, वडार हा समाज होता.

(१३) गढी-वाड्यांच्या प्रभावाखालील समाजव्यवस्थेत अस्पृश्यांचे जीवन हलाखीचे व दारिद्र्याने भरलेले होते. अंगमेहनतीचे कामे करूनच त्यांना आपला उदरनिर्वाह चालवावा लागत होता.

(१४) गढी-वाड्यांच्या काळात स्त्रियांवर बरीच बंधने होती. त्यांना समाजात खुले-पणाने फिरता येत नव्हते हे स्पष्ट होते. वतनदारांच्या स्त्रिया घोषात होत्या.

संदर्भ :

(१) आपटे वा. गो., मराठी शब्दरत्नाकर, सरस्वती ग्रंथ भंडार, पुणे, १९९९, पृ. १३८.
(२) खांडगे मंदा, वैभव पेशवेकालीन वाड्यांचे, साई प्रकाशन, पुणे, २००२, पृ. २१२.
(३) पाठक अरुणचंद्र (संपा.), लातूर जिल्हा गॅझेटिअर, भाग-२, महाराष्ट्र शासन दर्शनिका विभाग, मुंबई, २००८, पृ. २३९.
(४) जोशी तर्कतीर्थ श्री लक्ष्मणशास्त्री (संपा.), मराठी विश्वकोष, खंड-१५, महाराष्ट्र राज्य विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई, १९९५, पृ. ९५७.
(५) कठारे अनिल, मराठेकालीन पाटील, पूनम प्रकाशन, कंधार, १९९६, पृ. १६.
(६) पानसे मु. ग., यादवकालीन महाराष्ट्र, मराठी ग्रंथ संग्रहालय,मुंबई, १९६३, पृ. ८४.
(७) चिटणीस कृ. ना., मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, पुणे, १९७६, पृ. १९३.
(८) कठारे अनिल, शिवकाल व पेशवाईतील महारांचा इतिहास, सुधीर प्रकाशन, वर्धा, २००८, पृ. ३१.
(९) रोडे सोमनाथ (संपा.), इतिहास संशोधन पत्रिका, खंड-८, मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद, २००४, पृ. ४७.
(१०) अत्रे त्रिंबक नारायण, गावगाडा, वरदा बुक्स, पुणे, १९८९, पृ. ६४.

OOO



Scanned with AnyScanner